# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

**१०४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६/०२/२०२१**

**जिल्हा : अहमदनगर**

| मागील आठवड्यातील हवामान (१९/०२/२०२१ ते २५/०२/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानअंदाज (२७/०२/२०२१ ते ०३/०३/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २७ | २८ | ०१ | ०२ | ०३ |
| ७.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | २५.४ | २६.८ | २९.२ | ३०.० | ३१.६ | ३१.४ | कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३३ | ३४ | ३३ | ३३ |
| १६.१ | १२.९ | १४.९ | १५.५ | १५.३ | १४.७ | १५.९ | किमान तापमान (अं.से.) | १८ | १८ | १९ | २० | १९ |
| १.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढगस्थिती (आकाश) | १ | ० | ० | ० | ० |
| ८२.० | ९१.० | ८३.० | ८६.० | ८६.० | ८३.० | ८४.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३१ | ३५ | ३० | २४ | १८ |
| ४६.० | ३७.० | ३९.० | ३१.० | २५.० | ३४.० | २८.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १६ | १२ | १२ | १३ | ११ |
| ०.९ | २.० | ३.४ | २.९ | १.१ | ०.४ | ०.८ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ९ | ११ | १४ | १४ | ११ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल . शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत . तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | कांदा: फुलकिडे, करपा नि यंत्रणासाठी डायमेथोएट १५ मिली +कार्बेन्डॅझीम १० ग्रॅम + १० मिली स्टिकर प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भुईमुग | रोप अवस्था | जमीनीत ओलावा टिकविण्यासाठी , हवा खेळती राहण्यासाठी तसेच गवताचे व तणांचे नियंत्रण करण्यासाठी हात कोळप्याने कोळपणी करुन घ्यावी. |
| हरभरा | काढणी | हरभरा पीक सर्वसाधारणपणे ११० ते १२० दिवसांमध्ये काढणीसाठी परिपक्व होते. हरभरा पिकाची काढणी घाट्यामध्ये १४ ते १६ % ओलावा असताना करावी त्यामुळे नुकसान कमी होते. |
| हरभरा | घाटे भरण्याची अवस्था | पिवळी पडलेली रोगग्रस्त झालेली किंवा वाळलेली झाडे उपटून नष्ट करावी.<br>ज्या ठिकाणी हरभऱ्यात मोठ्या अवस्थेतील घाटे अळी आढळून आल्यास क्लोरंट्रानिलीप्रोल १८ .५० एस सी @ २ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे (एकरी २०० लिटर पाणी). |
| मका | दाणे भरताना | खोडकिडीच्या नियंत्रणासाठी उगावणीनंतर ८-१० दिवसांनी १५ मिली डायमेथोएट ३० % प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | | <u>खोडवा ऊस व्यवस्थापन:</u> ऊसाचे बुडखे मोठे राहिल्यास ते जमिनीलगत धारदार कोयत्याने छाटून घ्यावेत. त्यामुळे जमिनी खालील कोंब फुटण्यास वाव मिळतो व फूटव्यांची एकूण संख्या वाढते. बुडख्यांच्या छाटणी नंतर लगेचच ०.१ टक्के बाविस्टीन (१ ग्रॅम बाविस्टीन १ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणाची) या बुरशीनाशकाची फवारणी करावी. त्यामुळे मातीतून होणार्या बुरशीजन्य रोगांचा प्रतिबंध होतो.<br><u>ऊसाचे पाचट व्यवस्थापन:</u> ऊस तोडणी झाल्यानंतर ऊसाचे पाचट कुजविण्यासाठी पाचटावर प्रती हेक्टरी ८० किलो युरिया व १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जीवाणू टाकावे. |
| चवळी (चारा) | | माव्याच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५ टक्के फवारावे. मावा जास्त प्रमाणात असेल तर १० मिली डायमेथोएट ३० टक्केअ प्रवाही प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. औषध फवारल्यानंतर ७ दिवस जनावरांना हिरवा चारा घालू नये. |
| रब्बी ज्वारी | काढणी | पीक परिपक्व झाले असल्यास काढणी करून घ्यावी काढणी झालेल्या पिकाची मळणी करुन सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| कांदा | | फुलकिडे व करपा या कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट १५ मिली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ६ मिली अधिक कार्बेन्डॅझीम १० ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली+स्टिकर १० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | दाणे | मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव अर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | भरताना | थायामिथॉक्झाम २५ डब्लूजी. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवाराणी करावी. |
| मिरची | | मिरचीवरील रस शोषणा-या फुलकिडे, पानावरील ठिपके इत्यादी रोग आढळून आल्यास, त्यासाठी फिप्रोनील १५ मिली किंवा फेनपायरॉक्झीमेट ५ ईसी. १ 0 मिली. किंवा फेनाक्झाक्विन १० ईसी. २० मिली. अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झिवलोराईड २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने फवारणी करावी. दहा दिवसांच्या अंतराने या फवारण्या आलटून-पालटून कराव्यात. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २६/०२/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**